# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358 | सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १४१ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## बेलापूरमध्ये भीषण तिहेरी अपघातात एकाचा मृत्यू

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर परिसरात तीन वाहनांच्या भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. आगरी कोळी गावाजवळील रेल्वे उड्डाणपुलावर दोन कार आणि एका ऑटोरिक्षाची धडक झाली. या अपघातात ऑटोरिक्षाचालकाचा मृत्यू झाला असून, दोन महिला गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी सीबीडी बेलापूर पोलिसांनी एका कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

## ज्वेलरी दुकानातील कर्मचाऱ्याच्या कृत्याने मालकाला धक्का

मुंबई : मीरा-भाईंदरमध्ये तब्बल 4 किलो 300 ग्रॅम सोन्याच्या चोरीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका दागिन्यांच्या दुकानातून कोट्यवधी रुपयांचे सोने लंपास करून राजस्थानला पळून गेलेल्या आरोपींचा मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणात राजस्थानमधून दोन जणांना अटक करण्यात आली असून, त्यापैकी एक आरोपी संबंधित ज्वेलरी दुकानात जवळपास चार वर्षांपासून कर्मचारी म्हणून काम करत असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे.

# थोडक्यात वार्ता

## परभणी जिल्ह्यात कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रांचे वितरण

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:** परभणी जिल्ह्यात 20 हजार 774 कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले आहे. पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी जिल्ह्यात 17 सप्टेंबरपर्यंत मंडळस्तरावर विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे, त्याचा पात्र नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, जीवराज डापकर, संगीता चव्हाण आदींसह पत्रकार उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री चव्हाण म्हणाले की, दि. 7 सप्टेंबर 2023 रोजी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीस जिल्ह्यातील माहिती संकलित करून उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने दि. 18 सप्टेंबर 2023 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कक्षाची स्थापना करण्यात आली. या विशेष कक्षात विविध विभागांचे 12 सदस्य कार्यरत असून, समितीमार्फत अभिलेख शोधण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. या समितीचा परभणी जिल्हा दौरा दि. 19 ऑक्टोबर 2023 रोजी झाला. त्यानंतर जिल्ह्यातील विविध विभागांमधील अभिलेख तपासणीचे काम करण्यात आले असल्याचे ते म्हणाले. परभणी जिल्ह्यातील एकूण 13 विभागांमधील 25 लाख 30 हजार 96 विविध प्रकारच्या अभिलेखांची तपासणी करण्यात आली.

## आंदोलनकर्त्या मनपा कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:-** जीएसटी अनुदानाचा फरक व मागील काही महिन्यापासून थांबलेले वेतन व इतरप्रलंबित मागण्यासाठी गेल्या महिन्यापासून आंदोलन चालू आहे या आंदोलनाकडे दुर्लक्ष करीत असून आक्रमक झालेल्या आंदोलनकर्त्यांनी दिनांक 9 सप्टेंबर बुधवार रोजी स्टेशन कडे जाणारा मार्ग अडवून घंटागाडीतील कचरा रोडवर टाकला व विनापरवानगी रोडवरील वाहतूक थांबून जोर जोराने घोषणा दिल्या सध्याला जिल्ह्यामध्ये जमाव बंदी आदेश जिल्हाधिकारी यांचे आदेशाने लागू असून त्या आदेशाचे उल्लंघन केल्याने संबंधित आंदोलन कर्त्यावर नवा मुंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मागण्या मध्ये अनेक दिवसापासून पूर्ण वाचलेली वेतन द्यावे जीएसटी अनुदानाची फरक रक्कम अदा करावी वाढीव अनुदान द्यावे या मागणीसाठी महापालिकेतील कर्मचाऱ्यांनी 10 ऑगस्ट पासून काम मन आंदोलन सुरू केले आहे व या मागण्याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कर्मचाऱ्यांनी भीक मांगो आंदोलन केले पिंडदान आंदोलन केले अशा प्रकारे विविध प्रकारचे आंदोलन केले छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात रस्ता रोको आंदोलनही केले इतके सारे आंदोलन करूनही महाराष्ट्र शासनाने या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले असून त्यामुळे आंदोलन करते कर्मचारी आक्रमक झाले व त्यांनी 9 सप्टेंबर बुधवार रोजी महापालिका कार्यालयासमोरील मुख्य रस्त्यावर रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या मार्गावर हुंका गाडीतील कचरा रहदारीला अडथळा निर्माण केला व आंदोलन कर्त्यांनी कोणत्याही परवानगीशिवाय रस्त्यावरील वाहतूक थांबवून जोर जोराने घोषणाबाजी केलीं व जिल्हाधिकारी यांच्या जमाव बंदी आदेशाची उल्लंघन केले या प्रकरणी पोलीस जमादार मळजीराम मुजमुले यांच्या फिर्यादीवरून नासेर खान के.के. भारसाकळे व्ही.एस. उफाडे विनय ठाकूर. गौतम जोंधळे राहुल पंडित.व इतर दहा ते बारा जनावर जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## "शाल जोडे"




# दुष्काळाच्या विळख्यात करपले शिवार; कोरड्याठाक पोळ्याने बळीराजाच्या डोळ्यात आणले पाणी!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने क्रूरपणे हिरावून घेतला असतानाही, आपल्या हक्काच्या व राजामाणसाच्या पोळ्याचा सण बळीराजाने आज उराशी ढीगभर वेदना आणि जड अंतःकरणाने साजरा केला. आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या बळीराजाच्या आयुष्यात पावसाने अशी काही दगाबाजी केली की, हिरवागार शिवार जणू राखरांगोळी होऊन गेला. नद्या, ओढे, तलाव सगळे कोरडेठाक पडल्याने बापाच्या काळजाला पीळ पडला; अन् ज्या सर्जा-राजाच्या जिवावर शेती फुलवली, त्या लाडक्या मुक्या प्राण्याला आज थेट घरातून बादलीने पाणी आणून आंघोळ घालावी लागली. शेतात डोळ्यांसमोर पिके करपत असताना बळीराजा अक्षरशः कोमात गेला आहे. या भीषण दुष्काळाच्या सावटाखाली यंदाचा सण कुठलाही उत्साह न ठेवता केवळ एक परंपरेची खातरजमा म्हणून पार पाडावा लागला.

कुठलाही बडेजाव नाही, कसलाही सणाचा तोरा नाही; अगदी मोजक्याच शब्दांत सांगायचे तर यंदाचा पोळा म्हणजे अंगावर काटा आणणारी एक विदारक कहाणी ठरली. गावोगावच्या वेशींवर पूर्वी होणारी ती पारंपरिक चढाओढ, मानाचा बैल पुढे काढण्यासाठी होणारी लगबग आणि अंगात संचारणारा तो उत्साह यंदा कुठेही दिसत नव्हता. जिथे सणासुदीला सलोखा राखण्यासाठी पोलिसांना बंदोबस्त ठेवावा लागला असता, त्या गावोगावच्या वेशी आज अगदी सुन्न आणि सामसूम



पडल्या होत्या. 'पोळा आणि पाऊस झाला भोळा' ही म्हण यंदा निसर्गाने अगदी क्रूरपणे खोटी ठरवली. गेल्या सव्वा महिन्यापासून पावसाने मारलेली दीर्घ दांडी आणि गायब झालेला वरुणराजा यामुळे कपाशी, तूर, सोयाबीन, मूग आणि उडीद यांसारखे संपूर्ण खरीप हंगाम हातातून निघून गेले आहेत. जिल्ह्यातील तब्बल पंच्याहत्तर टक्क्यांपेक्षा जास्त खरीप वाया गेल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यातून रक्ताचे पाणी आले आहे.

पावसाच्या या भयानक खंडाने जमिनीतील शेवटचा ओलावाही शोषून घेतला आहे. ऊस, कपाशी आणि तुरीसारख्या पिकांवर निरनिराळ्या रोगांनी जीवघेणा हल्ला चढवला असून, पिके हाताशी येण्याच्या क्षणीच जळून खाक झाल्यामुळे बळीराजाचे कंबरडे पूर्णपणे मोडले आहे. शेतीत आधुनिक यंत्रे आली तरी संकटाच्या काळात आजही गोरगरीब शेतकऱ्यांनी दुष्काळाशी दोन हात करत आपल्या परीने लाडक्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त केलीच. बाजारपेठेत दुकानांमध्ये रंग, गोंडे, झूल आणि घुंगरमाळा दिमाखात सजल्या होत्या; पण शेतकऱ्याच्या खिशात एक रुपयाही नसल्याने खरेदीचा तो आनंद फिका पडला. ऐन सणाच्या तोंडावर व्यापाऱ्यांचेही आर्थिक गणित बिघडले, तर बहुतांश शेतकऱ्यांनी नवीन खरेदी न करता गतवर्षीचा जुनाच साज आपल्या बैलांच्या पाठीवर चढवून या परंपरेला जसेतसे तोंड दिले.

नंद्या-महाद्या, ढवळ्या-पवळ्या, धुळ्या-चपळ्या यांसारख्या सख्ख्या जिवाभावाच्या नावांनी आपल्या बैलांच्या पाठी सजविल्या गेल्या. दुष्काळाच्या जळत्या ज्वाळा अंगावर घेतही बळीराजाने शिंगांना फुगे, अंगावर ऐनेदार झुली अन् बाशिंगे बांधून "शिंगे रंगविली... बाशिंगे बांधिली...' असा अस्सल ग्रामीण थाट या कोरड्या वातावरणातही उभा केला. संकटे कितीही डोंगराएवढी मोठी असोत, बळीराजाचे आणि त्याच्या सर्जा-राजाचे नाते कधीच विरघळत नाही, हेच या कोरड्या आणि हलाखीच्या पोळ्याने पुन्हा एकदा जगाला दाखवून दिले आहे.

# मालमत्ता कर थकबाकीपोटी १४ दुकाने सील; एकाच दिवसांत ५० लाख रुपयांची वसुली

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

महानगरपालिकेच्या थकबाकीदार मालमत्ताधारकांविरोधातील मोहिमेला मोठा वेग मिळाला असून, आज मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे व उपायुक्त (कर निर्धारक व संकलक) विकास नवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध झोन कार्यालयांनी मोठी कारवाई केली. कर न भरणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांच्या मालमत्तांवर जप्तीचा बडगा उगारत आज दिवसभरात एकूण १४ दुकाने व मालमत्ता सील करण्यात आल्या, तर मोहिमेदरम्यान तब्बल ५० लाख २० हजार रुपयांचा कर वसूल करण्यात आला.




आजच्या दिवसभरात महापालिकेच्या पथकांनी सर्वच झोनमध्ये धडक मोहीम राबवली. यामध्ये झोन १ मध्ये ०१ मालमत्ता सील करून २ मालमत्ताधारकांकडून २ लाख ५९ हजार रुपयांची वसुली करण्यात आली. झोन २ मध्ये ०२ मालमत्ता सील करण्यात आल्या, तर झोन ४ मध्ये ०४ मालमत्ता सील करण्याची कारवाई करण्यात आली. झोन ५ मध्ये ०१ मालमत्ता सील करून १ मालमत्ताधारकाकडून १ लाख ५० हजार रुपये वसूल करण्यात आले. झोन ६ मध्ये देखील ०१ मालमत्ता सील व १ मालमत्ताधारकाकडून १ लाख ५० हजार रुपयांची वसुली झाली. झोन ७ मध्ये ०१ मालमत्ता सील करण्यात आली आणि ४ मालमत्ताधारकांकडून तब्बल १२ लाख ४८ हजार रुपयांची मोठी वसुली करण्यात आली. तसेच झोन ८ मध्ये ०४ मालमत्ता सील करून १ मालमत्ताधारकाकडून २ लाख ५० हजार रुपयांचा कर वसूल करण्यात आला.

महापालिकेच्या पथकांनी दिवसभरात केलेल्या या धडक कारवाईमुळे थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. मनपा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, यापुढे दर आठवड्यातील गुरुवार व शुक्रवारी थकबाकीदार मालमत्ताधारकांवर सातत्याने अशाच प्रकारे जप्तीची आणि सील करण्याची कारवाई तीव्र स्वरूपात केली जाणार आहे. शहराच्या विकासासाठी आणि नागरी सुविधांच्या पूर्ततेसाठी कर वेळेवर भरणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे कोणत्याही कायदेशीर व अप्रीय कारवाईचा सामना करण्याची वेळ येऊ नये, यासाठी सर्व संबंधित मालमत्ताधारकांनी आपला थकित मालमत्ता कर त्वरित भरावा आणि महापालिकेच्या या मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी केले आहे.

## बालमनावर मूल्यसंस्कार रुजविणारे साहित्य असावे

### डॉ.विनोद सिनकर यांचे प्रतिपादन

**छत्रपती संभाजीनगर :** वर्तमानातातील परिस्थिती पाहता बालमनावर आपण कोणते संस्कार करीत असतो,याचा गांभिर्याने विचार करायची वेळ आलेली आहे. समाज माध्यमे,मोबाईल सारख्या माध्यमांच्या अविवेकी वापराने समाजमन बदलत आहे. वास्तवात बालमन समृद्ध करणारे आणि मूल्यसंस्कार रुजविणारे साहित्यच प्रभावी ठरते, असे प्रतिपादन डॉ.विनोद सिनकर यांनी मांडवा (जि. जालना ) येथे झालेल्या बालकुमार संमेलनात काढले.

पद्मभूषण डॉ.बद्रीनारायण बारवाले विद्यालयात संमेलन पार पडले. स्व.दत्तात्रय हेलसकर स्मृतिदिनानिमित्त साने गुरूजी कथामाला आणि साहित्य भारती यांच्या संयुक्त विद्यमाने संमेलनाचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होत. या संमेलनाचे डॉ.विनोद सिनकर अध्यक्ष होत. संमेलनाचे उदघाटन साहित्य भारतीचे देवगिरी प्रांत कार्याध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार उमेश काळे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी साने गुरुजी कथामालेचे प्रमुख कार्यवाह आर.आर. जोशी, संस्थाध्यक्ष किसनराव सोलाट, सचिव नंदाताई सोलाट, उपाध्यक्ष ज्ञानदेव चंद,मुख्याध्यापिका अंजली सोलाट, साने गुरुजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष डॉ.सुहास सदाव्रते, साहित्य भारती जालना शाखेच्या अध्यक्षा शुभांगी लिंगायत, जगदीश कुडे, जवाहर तुल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.

## पत्नीला घेण्यासाठी गेलेल्या शिक्षकाच्या मोटारसायकलवरील 78 हजारांचा ऐवज लांबवला

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

शहरातील सिडको परिसरातील कॅनॉट प्लेस भागात एक घटना उघडकीस आली आहे. रक्षाबंधनानिमित्त माहेरवरून आलेल्या पत्नीला घेऊन घरी जात असताना, अज्ञात चोरट्यांनी दुचाकीच्या सीटवर ठेवलेली सोन्याचे दागिने आणि मोबाईल असलेली बॅग लांबवल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेखर प्रदीप हिवराळे (वय २९, रा. राधास्वामी कॉलनी, जटवाडा रोड, हर्सूल) हे व्यवसायाने शिक्षक असून, कन्नड येथील आयटीआय कॉलेजमध्ये शिल्पनिदेशक म्हणून काम करतात. त्यांची पत्नी पुनम या रक्षाबंधनानिमित्त माहेरी गेल्या होत्या. त्यांना आणण्यासाठी शेखर हे ९ सप्टेंबर रोजी गेले होते. यावेळी पुनम यांच्याकडे पाठीवरची एक बॅग होती, ज्यामध्ये सोन्याचे दागिने, काही रोकड आणि एक नवीन मोबाईल फोन होता.. शेखर हे आपल्या पत्नीला मुकुंदवाडी येथून घेऊन दुचाकीवरून कॅनॉट प्लेस येथे आले. कॅनॉट प्लेस येथे आल्यावर त्यांनी पत्नीकडील पाठीवरची बॅग दुचाकीच्या सीटवर ठेवली. त्यानंतर दोघेही सिमकार्ड घेण्यासाठी गेले आणि काही वेळातच घरी जाण्यासाठी गाडीकडे परतले. पुनम यांनी गाडीवर ठेवलेली बॅग जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ आसपासच्या परिसरात शोधाशोध केली, परंतु बॅग कुठेही आढळून आली नाही. अज्ञात चोरट्याने लाभाच्या इराद्याने दुचाकीवर ठेवलेली बॅग चोरून नेल्याची त्यांची खात्री पटली.

या चोरीमध्ये ३५ हजार रुपये किमतीचे २.७५० ग्रॅम


## कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठी परभणी जिल्ह्यात विशेष शिबीरे

# पात्र नागरिकांनी कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,:** कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्यासाठी परभणी जिल्ह्यात १७ सप्टेंबर २०२६ पर्यंत मंडळस्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांचा लाभ पात्र नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

जलसंपदा (गोदावरी-कृष्णा खोरे महामंडळ) मंत्री तथा अध्यक्ष, मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या निर्देशानुसार ही कार्यवाही करण्यात येत आहे. कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक कार्यवाही अधिक गतिमान व्हावी, यासाठी मंडळस्तरावर शिबिरे



आयोजित करण्यात आली आहेत. शिबिरांचा तपशील पुढील प्रमाणे आहे

**परभणी तालुका :** टाकळी कु., झरी, पेडगाव, सिंगणापूर, दैठणा, पिंपळी, जांब तसेच परभणी शहर/ग्रामीण येथे दि. ११ सप्टेंबर रोजी शिबिर होणार आहे.

**गंगाखेड तालुका :** महातपुरी – ११ सप्टेंबर, माखणी – १२ सप्टेंबर, पिंपळदरी – १३ सप्टेंबर, राणी सावरगाव – १५ सप्टेंबर.

**पूर्णा तालुका :** पूर्णा, कात्नेश्वर, कावलगाव – ११ सप्टेंबर.

**पालम तालुका :** पालम (पुयणी), पेठशिवणी (भोगाव) – ११ सप्टेंबर; रावराजूर, तांदुळवाडी – १५ सप्टेंबर.

**सेलू तालुका :** सेलू, वालूर – ११ सप्टेंबर; चिकलठाणा बु., देऊळगाव गा. – १५ सप्टेंबर; कुपटा, मोरगाव – १६ सप्टेंबर.

**जिंतूर तालुका :** दुधगाव, आडगाव खु. – ११ सप्टेंबर; सांगवी मा., बामणी तसेच चारठाणा, वाघी धा. – १५ सप्टेंबर.

**पाथरी तालुका :** बाभळगाव – ११ सप्टेंबर; हादगाव बु. – १५ सप्टेंबर; कासापुरी – १६ सप्टेंबर.

**मानवत तालुका :** मानवत, केकरजवळा – ११ सप्टेंबर; कोल्हा, ताडबोरगाव – १५ सप्टेंबर.

**सोनपेठ तालुका :** आवलगाव (बोदरगाव) – ११ सप्टेंबर; सोनपेठ (थडी पिंपळगाव), वडगाव, शेळगाव (शिरशी बु.) – १५ सप्टेंबर.

सदर मंडळाच्या मुख्यालय स्तरावर हे शिबिर होणार आहेत. परभणी जिल्ह्यातील कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा पात्र नागरिकांनी आपल्या गावासाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकानुसार संबंधित शिबिराच्या ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून जात प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेचा लाभ घ्यावा.

जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी काही अडचणी किंवा अडथळे निर्माण झाल्यास संबंधित शिबिराच्या नियंत्रण अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. पात्र नागरिकांनी शिबिराच्या तारखेची नोंद घेऊन वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

## करडगाव येथे 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासोबत' कार्यक्रम उत्साहात संपन्न

# हवामान बदलाच्या परिस्थितीत 'त्रिशूल तंत्रज्ञान' आत्मसात करणे काळाची गरज – डॉ. हरीश आवारी

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या प्रेरणेतून तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली मागील तीन वर्षांपासून 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासोबत' हा अभिनव कृषि विस्तार उपक्रम राबविण्यात येत आहे. 'शेतकरी देवो भव' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमांतर्गत मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद, प्रक्षेत्र भेटी, कृती प्रात्यक्षिके व शेतकरी मेळावे आयोजित केले जातात.

या उपक्रमांतर्गत दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी करडगाव (ता. व जि. परभणी) येथे शेतकरी संवाद व मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न झाले. यावेळी विविध विषयांवरील तज्ज्ञ मार्गदर्शनास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सिंचन पाणी व्यवस्थापन प्रकल्पाचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. हरीश आवारी यांनी हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर 'त्रिशूल तंत्रज्ञान' आत्मसात करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. पावसाळ्यात अतिरिक्त वाहून जाणारे पाणी शेततळ्यात साठवणे, सौरऊर्जेवर चालणाऱ्या पंपाद्वारे त्याचा उपसा करणे आणि ठिबक सिंचनाच्या माध्यमातून पिकांना गरजेनुसार पाणी देणे, या तीन बाबी त्रिशूल तंत्रज्ञानाचे प्रमुख घटक असल्याचे



त्यांनी स्पष्ट केले.

ठिबक सिंचनामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होऊन उत्पादनक्षमता वाढविता येते. तुरीसारख्या पिकांमध्ये ठिबक सिंचनाचा वापर केल्यास ४० ते ६० टक्क्यांपर्यंत पाणी बचत होऊ शकते. त्यामुळे पारंपरिक पाट सिंचनाच्या तुलनेत उपलब्ध पाण्यात सुमारे दोन ते अडीच पट अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणता येते, असे डॉ. आवारी यांनी सांगितले. कमी पाण्यात येणारी तसेच बाजारपेठेत चांगली मागणी आणि दर असलेली पिके निवडल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.

ठिबक सिंचनाच्या माध्यमातून तुरीचे उत्पादन घेऊन एकरी एक लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळविण्याचे अनुभव विविध शेतकऱ्यांनी घेतले असल्याचे उदाहरणांसह स्पष्ट करत त्यांनी शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा अधिकाधिक अवलंब करावा, असे आवाहन केले.

कोरडवाहू शेती संशोधन केंद्रातील मृद व जलसंधारण विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. मधुकर मोरे यांनी पावसाच्या खंड काळात जमिनीतील ओलावा टिकविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना तसेच 'सुखा रक्षक' अॅपचा वापर याबाबत मार्गदर्शन केले. सिंचन व निचरा अभियांत्रिकी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. विशाल इंगळे यांनी सिंचन व्यवस्थापन व ड्रोन तंत्रज्ञानाची माहिती दिली. कृषी पर्यवेक्षक श्री. भास्कर सुरनर यांनी पिकांवरील कीड व रोगांच्या प्रभावी नियंत्रणाबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठातील सहाय्यक लेखाधिकारी, संशोधन व उपनियंत्रक श्री. नामदेवराव वल्लमवाड यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने केले. यावेळी ४८ शेतकऱ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. माऊली खिस्ते यांनी केले.

कार्यक्रमानंतर तज्ज्ञांनी शेतकऱ्यांसोबत प्रक्षेत्र भेट देऊन विविध पिकांची पाहणी केली. पिकांची सद्यस्थिती, पाण्याची उपलब्धता आणि हवामानातील बदल लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजनांबाबत त्यांनी प्रत्यक्ष शेतावर मार्गदर्शन केले.

# सं पा द की य

## पाच टक्के आरक्षणाचे सुधारित धोरण मंजूर

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय सेवेत नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी असलेल्या ५ टक्के आरक्षणाला आता एकसंध आणि प्रभावी धोरणाची जोड मिळणार आहे. विविध शासन निर्णयांमधील तरतुदींमध्ये सुसूत्रता आणत खेळाडू आरक्षणाचे सुधारित धोरण लागू करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिली आहे. या नव्या धोरणामुळे बोगस प्रमाणपत्रांना मोठा आळा बसणार असून गुणवंत खेळाडूंना न्याय मिळण्याचा मार्ग अधिक सुकर झाला आहे. शासकीय, निमशासकीय आणि शासनाकडून निधी किंवा अनुदान मिळणाऱ्या विविध संस्थांमधील गट-अ, ब, क आणि ड संवर्गातील सरळसेवेच्या पदांसाठी हे ५ टक्के समांतर आरक्षण लागू राहणार आहे. यामध्ये मंत्रालयीन विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, महानगरपालिका, शासकीय उपक्रम, मंडळे, महामंडळे, विद्यापीठे, अनुदानित शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा, सहकारी संस्था आणि शासनमान्य स्वयंसेवी संस्थांचा समावेश करण्यात आला आहे. सुधारित धोरणातील सर्वात महत्त्वपूर्ण बदल म्हणजे क्रीडा ई-प्रमाणपत्राची स्वयंचलित डिजिटल कार्यप्रणाली असणार आहे. स्पर्धा संपल्यानंतर सात दिवसांच्या आत निकाल डिजिटल स्वाक्षरीसह अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले असून, ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे या डेटामध्ये फेरफार करता येणार नाही. ऑटोमेटेड क्रिप्टोग्राफिक हॅशच्या माध्यमातून प्रमाणपत्राची सत्यता तत्काळ पडताळता येणार आहे. या धोरणात आरक्षणासाठी पात्र खेळांची व्याप्तीही स्पष्ट करण्यात आली असून, २००५ नंतर सलग तीन उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये समाविष्ट असलेले खेळ तसेच कबड्डी, खो-खो, बुद्धिबळ, मल्लखांब आणि क्रिकेट या देशी खेळांचाही समावेश करण्यात आला आहे. गट-अ ते गट-ड पदांसाठी वेगवेगळे पात्रता निकष निश्चित करण्यात आले असून, ऑलिम्पिकपासून ते राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पदवी विजेत्या खेळाडूंना त्यांच्या पात्रतेनुसार विविध गटांमध्ये संधी मिळणार आहे. दरम्यान, या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंना क्रीडा प्रमाणपत्राची वैधता तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले असून, यापूर्वीच्या निर्णयानुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनाही नव्या शासन निर्णयाच्या तारखेपासून तीन महिन्यांत प्रमाणपत्र पडताळून घेणे अनिवार्य असणार आहे.

## कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्पाचा नियोजित आराखडा जाहीर होणार

मुंबई : मुंबईच्या ऐतिहासिक आणि सामाजिक वारसा लाभलेल्या कामाठीपुरा परिसराचा चेहरामोहरा बदलणाऱ्या बहुचर्चित 'कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्पाचा' नियोजित आराखडा अखेर समोर येत आहे. म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे आणि कामाठीपुरा विकास समितीच्या संयुक्त विद्यमाने या प्रकल्पाच्या मास्टर प्लॅनचे विशेष सादरीकरण आयोजित करण्यात आले आहे. उद्या, शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता अखिल पद्मशाली समाज, भावना बाग, कामाठीपुरा, सहावी गल्ली, मुंबई येथे हा कार्यक्रम पार पडणार आहे. महाराष्ट्र शासनाचा हा अत्यंत महत्त्वाकांक्षी समूह पुनर्विकास प्रकल्प असून, म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत (MBRRB) DCPR २०३४ मधील विनियम ३३(९) अंतर्गत राबवला जात आहे. यासाठी म्हाडाला 'नोडल एजन्सी' तसेच 'विशेष नियोजन प्राधिकरणाचा' (SPA) दर्जा देण्यात आला आहे.

# पावसाच्या खंड काळातील पीक व्यवस्थापन व हाती घ्यावयाच्या उपाययोजना

## वनामकृविच्या अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पातील शास्त्रज्ञांचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी** :-मराठवाड्यातील शेती मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून आहे. पावसाचे असमान वितरण, पावसातील खंड आणि बदलत्या हवामान परिस्थितीमुळे पिकांवर पाण्याचा ताण निर्माण होऊन त्याचा पिकांच्या वाढीवर, उत्पादनावर तसेच पशुधनासाठी उपलब्ध होणाऱ्या चाऱ्यावर परिणाम होऊ शकतो. पावसाच्या खंड काळात उपलब्ध जमिनीतील ओलावा, पाणी, अन्नद्रव्ये आणि चारा यांचे काटकसरीने व कार्यक्षम व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे. या काळात शेतकऱ्यांनी पिकांची अवस्था, जमिनीतील ओलावा आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन पुढील उपाययोजनांचा सल्ला परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले अखिल भारतीय कोरडवाहू प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी डॉ. आनंद गोरे, डॉ. मधुकर मोरे, डॉ . गणेश गायकवाड, डॉ. पपीता गौरखेडे यांनी दिला आहे.

१. पिकांची सद्यस्थिती व जमिनीतील ओलाव्याचे नियमित निरीक्षण करावे

पिकांची वाढीची अवस्था, पानांची स्थिती, मुळांच्या परिसरातील ओलावा, पिकांमध्ये पाण्याच्या ताणाची लक्षणे यांचे नियमित निरीक्षण करावे.

हलकी जमीन, मध्यम जमीन आणि भारी जमीन यामध्ये उपलब्ध ओलाव्याचे प्रमाण वेगवेगळे असल्याने सर्व शेतांसाठी एकच उपाययोजना न करता जमिनीचा प्रकार व पिकाची अवस्था विचारात घ्यावी. पिकांमध्ये सकाळच्या वेळी पाने कोमेजणे, पानांचा रंग बदलणे किंवा वाढ मंदावणे यासारखी लक्षणे दिसल्यास ओलावा संवर्धन, संरक्षित सिंचन, आच्छादन, हलक्या कोळपण्या, अन्नद्रव्याची फवारणी, साध्या पाण्याची फवारणी, जल संधारण सारी काढणे यापैकी शक्य असेल अशा आवश्यक उपाययोजना कराव्यात.

२. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून संरक्षित सिंचन द्यावे

सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांनी पाण्याचा कार्यक्षम व काटकसरीने वापर करावा. उपलब्ध पाणी संपूर्ण क्षेत्राला कमी प्रमाणात देण्यापेक्षा पिकांच्या संवेदनशील वाढीच्या अवस्थेत संरक्षित सिंचनास प्राधान्य द्यावे.

विशेषतः फुलोरा, शेंगा/बोंडांची निर्मिती, दाणे भरणे किंवा फळवाढ यांसारख्या संवेदनशील अवस्थेत आवश्यकतेनुसार संरक्षित सिंचन दिल्यास पिकांना पाण्याच्या ताणापासून संरक्षण मिळण्यास मदत होते.

ठिबक व तुषार सिंचनासारख्या कार्यक्षम सिंचन पद्धतींचा वापर करून उपलब्ध पाण्याचा जास्तीत जास्त क्षेत्रासाठी कार्यक्षम वापर करावा. सकाळी किंवा सायंकाळी सिंचन पाणी द्यावे याचा प्रयत्न करावा.

३. पावसाचे प्रत्येक थेंब शेतात अडवून जमिनीत मुरवावा

पावसाच्या खंडानंतर पडणारा पाऊस अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे पावसाचे पाणी शेताबाहेर वाहून न जाता शेतात जास्तीत जास्त मुरेल, यासाठी जलसंधारणाच्या उपाययोजना कराव्यात.

विशेषतः कपाशी व तूर पिकांमध्ये जलसंधारण सऱ्या काढून पावसाचे पाणी मुराविण्याचा उपाय करावा आणि पडणारे पावसाचे पाणी जास्तीत जास्त मुरेल किंवा अडवावे अशा सऱ्या काढाव्यात. उपलब्ध परिस्थितीनुसार सरी-वरंबा, कंटूर सऱ्या, बांधबंदिस्ती, इत्यादी उपायांचा अवलंब करावा. शेततळे, नाला बांध, पाझर तलाव, विहिरी, कूप नलिका, येथील उपलब्ध पाणी आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर करून काटकसरीने वापरावे.

"पावसाचा प्रत्येक थेंब – शेताच्या बांधात व जमिनीच्या पोटात" या दृष्टिकोनातून जलसंधारण करावे.

४. तण नियंत्रणाला प्राधान्य द्यावे

पावसाच्या खंड काळात पिकांबरोबर तणेही जमिनीतील उपलब्ध पाणी व अन्नद्रव्यांसाठी स्पर्धा करतात. त्यामुळे तण नियंत्रणाला विशेष महत्त्व आहे.

पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार आवश्यकतेनुसार आंतरमशागत, खुरपणी किंवा शिफारशीनुसार तणनाशकांचा वापर करावा. तणांचे वेळीच नियंत्रण केल्यास उपलब्ध जमिनीतील ओलावा पिकांना अधिक काळ उपलब्ध राहण्यास मदत होते. जिथे शक्य आहे तिथे उपट तण करावे.

५. पिकांच्या अवस्थेनुसार आंतरमशागत करून ओलावा टिकवावा

पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार योग्य वेळी आंतरमशागत करावी. जमिनीच्या पृष्ठभागावर निर्माण झालेल्या भेगा बुजविल्यास बाष्पीभवनाद्वारे होणारा ओलाव्याचा ऱ्हास कमी होण्यास मदत होते. आंतरमशागत करताना पिकांच्या मुळांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनीची परिस्थिती व पीक अवस्था लक्षात घेऊन योग्य वेळी कोळपणी किंवा इतर आंतरमशागतीची साधने वापरावीत. फळबागेत यावर भर द्यावा.

६. कीड व रोगांचे नियमित निरीक्षण व एकात्मिक व्यवस्थापन करावे

पावसाच्या खंड काळात पिकांवरील कीड व रोगांचे नियमित निरीक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी नियमित पिकांची पाहणी करून किडींचा प्रादुर्भाव, किडीची संख्या, रोगांची लक्षणे आणि प्रादुर्भावाची तीव्रता तपासावी. शक्य तेथे जैविक निविष्ठा, जैविक नियंत्रण, पक्षीथांबे, चिकट सापळे, फेरोमोन सापळे इत्यादींचा वापर करावा. कीड आर्थिक नुकसान पातळीच्या पुढे गेल्यानंतरच संबंधित पिकासाठी शिफारशीत रासायनिक कीटकनाशकाचा वापर करावा. अनावश्यक व अवाजवी कीटकनाशकांच्या फवारण्या टाळाव्यात.

७. आच्छादनाचा वापर करून जमिनीतील ओलावा संरक्षित करावा

पिकांच्या ओळींमध्ये उपलब्ध पीक अवशेष, गवत किंवा इतर सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन केल्यास जमिनीच्या पृष्ठभागावरील बाष्पीभवन कमी होऊन ओलावा अधिक काळ टिकवून ठेवण्यास मदत होते. आच्छादनामुळे जमिनीचे तापमान नियंत्रित राहण्यास, तणांची वाढ कमी होण्यास आणि कालांतराने सेंद्रिय पदार्थ वाढण्यास मदत होते. त्यामुळे उपलब्धतेनुसार सेंद्रिय खते व जैविक निविष्ठांचा वापर करावा.

८. पिकांच्या अवस्थेनुसार अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे

पावसाच्या खंड काळात जमिनीतील ओलावा कमी असल्यामुळे मुळांद्वारे अन्नद्रव्यांचे शोषण कमी होऊ शकते. अशा परिस्थितीत पिकाची वाढीची अवस्था, जमिनीतील उपलब्ध ओलावा आणि स्थानिक हवामान परिस्थिती विचारात घेऊन पिकांच्या अवस्थेनुसार अन्नद्रव्यांची फवारणी करावी. आवश्यकतेनुसार पोटॅशियम नायट्रेट (१ ते २ टक्के) किंवा ००|५०|३४ (१ टक्का) यांची फवारणी ८ ते १० दिवसांच्या अंतराने करता येते. यामुळे पिकांना पाण्याचा ताण सहन करण्यास मदत होऊ शकते. मात्र फवारणी करताना पिकाची अवस्था, उपलब्ध ओलावा आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच अन्नद्रव्यांची निवड, मात्रा व फवारणीची वेळ निश्चित करावी. याशिवाय साध्या पाण्याची फवारणी करता येते. यामुळे ३ते ४ दिवस पीक पाण्याचा ताण सहन करू शकते.

९. जैविक निविष्ठांचा वापर करावा

पावसाच्या खंड काळात पिकांवर येणारा जैविक व अजैविक ताण कमी करण्यासाठी जैविक निविष्ठांचा वापर उपयुक्त ठरतो. उपलब्धतेनुसार व शिफारशीनुसार बायो-एनपीके, बायोमिक्स, मायकोरायझा इत्यादींचा वापर करावा. तसेच पिअवन्च्य अवस्थेनुसार आणि विशेषकरून फळ पिकात शेणखत, कंपोस्ट, गांडूळखत आणि इतर सेंद्रिय खतांचा वापर केल्यास जमिनीची भौतिक स्थिती, सूक्ष्मजीवांची क्रियाशीलता व पाणी धरून ठेवण्याची क्षमता सुधारण्यास मदत होते.

**१०. पशुधनासाठी चारा पिकांचे नियोजन करावे** : पावसाच्या खंड काळाचा परिणाम केवळ पिकांवरच नव्हे तर पशुधनासाठी उपलब्ध होणाऱ्या हिरव्या चाऱ्यावरही होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी उपलब्ध पाणी व क्षेत्राचा विचार करून पशुधनासाठी चारा पिकांचे नियोजन करावे. शक्य असल्यास ज्वारी, मका, बाजरी, चारा गवत, बरसीम/लुसर्नसारखी योग्य हंगामी चारा पिके तसेच स्थानिक परिस्थितीस अनुरूप चारा पिकांची निवड करावी. चारा पिकांची निवड करताना पाण्याची उपलब्धता, लागवडीचा कालावधी आणि पशुधनाची संख्या विचारात घ्यावी.

उपलब्ध हिरवा चारा योग्य अवस्थेत कापून वाळवून hay (हे ) तयार करणे किंवा योग्य पद्धतीने silage मुरघास तयार करून साठवणे उपयुक्त ठरते. यामुळे पुढील पावसाच्या खंड काळात चाऱ्याची उपलब्धता राखता येते.

११. उपलब्ध चाऱ्याचे पौष्टिक मूल्य व उपयोगिता वाढवावी

चाऱ्याची कमतरता भासण्याची शक्यता असल्यास उपलब्ध चाऱ्याचा अपव्यय टाळून त्याचा पौष्टिक व कार्यक्षम वापर करावा. कडबा किंवा वाळलेल्या चाऱ्याचे योग्य आकारात चाफिंग (कुट्टी) केल्यास त्याचा अपव्यय कमी होऊन पशुधनाला चारा खाणे सुलभ होते. उपलब्ध हिरवा चारा, वाळलेला चारा आणि कडधान्यवर्गीय चारा यांचे संतुलित मिश्रण करावे.

गरजेनुसार पशुवैद्यकीय/पशुपोषण तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली खनिज मिश्रण व आवश्यक पूरक खाद्य द्यावे. कमी पौष्टिक कडब्याची पौष्टिकता वाढविण्यासाठी युरिया प्रक्रिया किंवा इतर चारा प्रक्रिया पद्धती वापरण्यापूर्वी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.

चारा साठवताना तो पावसापासून सुरक्षित, कोरड्या व हवेशीर ठिकाणी साठवावा, जेणेकरून बुरशी वाढून चाऱ्याची गुणवत्ता कमी होणार नाही.

१२. फळबागेत विशेष पीक व्यवस्थापन करावे

पावसाच्या खंड काळात फळबागेतील झाडांवर पाण्याचा ताण येण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे फळबागेतील झाडांचे व जमिनीतील ओलाव्याचे नियमित निरीक्षण करावे.

ठिबक सिंचनाचा कार्यक्षम वापर

फळबागेत उपलब्ध असल्यास ठिबक सिंचनास प्राधान्य द्यावे. झाडांच्या मुळांच्या कार्यक्षम क्षेत्रात आवश्यक तेवढेच पाणी द्यावे. उपलब्ध पाण्यानुसार सिंचनाचे नियोजन करून अनावश्यक पाणी वापर टाळावा.

**सकाळी किंवा सायंकाळी सिंचन करावे** : पावसाच्या खंड काळात शक्यतो सकाळी लवकर किंवा सायंकाळी सिंचन करावे. या वेळेत तापमान तुलनेने कमी असल्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते. तीव्र उष्णतेच्या वेळी सिंचन टाळणे योग्य ठरते.

**फळझाडांच्या आळ्यात आच्छादन करावे** : झाडांच्या बुंध्याभोवती व मुळांच्या परिसरात सेंद्रिय आच्छादन करावे. यासाठी उपलब्ध पीक अवशेष, वाळलेले गवत किंवा इतर सेंद्रिय पदार्थ वापरता येतात. आच्छादनामुळे जमिनीतील ओलावा टिकून राहण्यास, जमिनीचे तापमान नियंत्रित राहण्यास आणि तणांची वाढ कमी होण्यास मदत होते. मात्र आच्छादन थेट झाडाच्या बुंध्याला चिकटून ठेवू नये, कारण त्यामुळे बुंध्याजवळ जास्त आर्द्रता निर्माण होऊन रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते.

फळबागेत रोग व्यवस्थापन

पावसातील खंडानंतर आर्द्रता व तापमानातील बदलांमुळे काही रोगांचा प्रादुर्भाव वाढू शकतो. त्यामुळे फळझाडांची नियमित पाहणी करावी. सुकलेल्या, रोगग्रस्त फांद्या व पाने काढून नष्ट करावीत आणि बागेत स्वच्छता ठेवावी. बोर्डोपेस्टचा वापर विशेषतः छाटणीच्या जखमा, खोडावरील जखमा किंवा संबंधित बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव असलेल्या भागावर संबंधित फळपिकासाठी शिफारशीत पद्धतीने करावा. बोर्डोपेस्ट तयार करण्याची पद्धत व प्रमाण पिकानुसार बदलू शकते; त्यामुळे कृषी तज्ज्ञांच्या शिफारशीनुसार योग्य प्रमाणातच वापर करावा. फळबागेत अनावश्यक रासायनिक फवारण्या टाळून एकात्मिक रोग व्यवस्थापनाला प्राधान्य द्यावे.

१३. फळबागेत अन्नद्रव्य व्यवस्थापन व झाडांवरील ताण कमी करावा

पाण्याचा ताण असताना जास्त प्रमाणात रासायनिक खते जमिनीत देणे टाळावे. झाडांची अवस्था, उपलब्ध ओलावा आणि अपेक्षित उत्पादन लक्षात घेऊन अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे.

आवश्यकतेनुसार आणि तज्ज्ञांच्या सल्ल्याने पर्णीय अन्नद्रव्य फवारणी करता येते. मात्र पाण्याचा तीव्र ताण असताना किंवा अतिउष्णतेच्या परिस्थितीत फवारणी न करता योग्य वेळ निवडावी.

१४. पुढील पावसासाठी शेत तयार ठेवावे

पावसाचा खंड संपल्यानंतर होणारा पाऊस कमी कालावधीत मोठ्या प्रमाणात पडण्याची शक्यता असल्याने शेतात पाणी अडविण्याची क्षमता निर्माण करणे आवश्यक आहे.

शेतातील बांध मजबूत करणे, जलसंधारणाच्या सऱ्या, चर, शेततळे आणि इतर जलसंधारणाच्या रचना सुस्थितीत ठेवाव्यात. पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी जास्तीत जास्त जमिनीत मुरेल यासाठी योग्य नियोजन करावे.

१५. शेततळे बशिभावान कमी करण्याचे उपाय; तापमान वाढल्यावर (ऑक्टोबर महिन्यापासून) किंवा उन्हाच्या लाटा असल्यास शेततळ्यातील पाण्याचे बाष्पीभवन कमी करण्यासाठी सीटायल अल्कोहोल २० मिलीग्राम प्रती चौरस मीटर यानुसार दर १० दिवसांनी पाण्याच्या पृष्ठभागावर वापरावे.

# "गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या, म्हणजे तो तिच्याविरुद्ध बंड करून उठेल." - महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर

समाजाच्या इतिहासात काही वाक्ये केवळ विचार मांडत नाहीत, तर माणसाच्या अंतर्मनाला हादरा देतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वरील वाक्य त्यापैकीच एक. या वाक्यातील 'गुलामी' हा शब्द केवळ शारीरिक बंधनाचा अर्थ सांगत नाही, तर माणसाच्या मनावर, विचारांवर आणि जगण्याच्या पद्धतीवर निर्माण झालेल्या अदृश्य बंधनांकडे निर्देश करतो. माणूस आपल्या परिस्थितीला अपरिहार्य मानू लागतो, अन्यायाला नशिबाचा भाग समजू लागतो आणि प्रश्न विचारण्याची ताकद गमावतो, तेव्हा खरी गुलामी जन्माला येते. त्यामुळे परिवर्तनाची पहिली पायरी बाह्य परिस्थिती बदलण्यात नसते; ती माणसाच्या मनात जागृती निर्माण करण्यात असते.

भारतीय समाजव्यवस्थेतील विषमता, शोषण आणि अन्यायाविरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी वंचित समाजाला केवळ अधिकारांची भाषा शिकवली नाही, तर स्वतःच्या माणूसपणाची जाणीव करून दिली. 'आपणही माणूस आहोत, आपल्यालाही समान हक्क आहेत, आपल्याला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे,' ही जाणीव निर्माण करणे हे त्यांच्या सामाजिक क्रांतीचे मूळ होते. म्हणूनच बाबासाहेबांचा विचार आजही केवळ इतिहासाचा विषय नाही; तो वर्तमानातील प्रत्येक अन्यायग्रस्त माणसाच्या जगण्याशी जोडलेला आहे.

गुलामीचे स्वरूप काळानुसार बदलत गेले. पूर्वी माणसाला प्रत्यक्ष बेड्या घातल्या जात; आज अनेकदा त्याच्या मनाभोवती भीतीच्या बेड्या निर्माण केल्या जातात. पूर्वी एखाद्याला उघडपणे दडपले जात असे; आज त्याला संधीपासून दूर ठेवणे, दबाव निर्माण करणे, अपमानित करणे किंवा त्याचा आवाज दुर्लक्षित करणे, हीदेखील गुलामीची आधुनिक रूपे ठरू शकतात. अज्ञान, गरिबी, सामाजिक दबाव, अन्यायाची सवय, नोकरी जाण्याची भीती, प्रतिष्ठा गमावण्याची चिंता आणि 'आपण काही बदल करू शकत नाही' हा न्यूनगंड यामुळे माणूस स्वतःभोवती अदृश्य भिंती उभ्या करतो.यातील सर्वांत धोकादायक गोष्ट म्हणजे अन्यायाची सवय. सुरुवातीला अन्याय माणसाला अस्वस्थ करतो. तो प्रश्न विचारण्याचा विचार करतो. नंतर त्याला सांगितले जाते, तू संस्थेचा नोकर आहेस,'कामापुरते काम करायचे, 'जास्त प्रश्न विचारू नका', 'कोणाच्या नादी लागू नका'.

पाठीमागे मी असेच एका कर्मचाऱ्याला काढून टाकले. अशा धमक्यामुळे काही काळाने तो शांत होतो. आणखी काही काळाने त्याला तीच परिस्थिती सामान्य वाटू लागते. शेवटी अन्याय बदलण्याऐवजी तो स्वतःच अन्यायाशी जुळवून घेतो. हीच मानसिक गुलामीची सर्वांत मोठी खूण आहे.

आजच्या कर्मचारी वर्गाच्या संदर्भात हा प्रश्न अधिक गांभीर्याने विचारण्याची गरज आहे. कर्मचारी हा कोणत्याही संस्थेचा महत्त्वाचा घटक असतो. त्याच्या श्रमावर कार्यालये, संस्था आणि व्यवस्था उभी असते. त्याच्याकडून कर्तव्याची अपेक्षा केली जाते; ती योग्यच आहे. परंतु कर्तव्य बजावताना त्याला सन्मान, न्याय, सुरक्षितता आणि नियमांनुसार वागणूक मिळणेही तितकेच आवश्यक आहे. वरिष्ठांचा आदर करणे ही शिस्त आहे; परंतु अन्याय सहन करणे ही शिस्त नाही. संस्थेप्रती निष्ठा असणे ही जबाबदारी आहे; परंतु चुकीच्या कृतींना समर्थन देणे ही निष्ठा नाही.

अनेक कर्मचारी केवळ नोकरी टिकवण्यासाठी मनातील असंख्य प्रश्न दाबून ठेवतात. चुकीचा निर्णय झाला तरी गप्प राहतात. वर्षानुवर्ष इन्क्रिमेंट म्हणजे वेतन वाढ थांबविली तरी शांत राहतात. अन्याय झाला तरी 'उद्या बघू' म्हणतात. सहकाऱ्यावर अन्याय झाला तरी 'आपल्याला काय करायचे?' अशी भूमिका घेतात. कारण त्यांच्या मनात एक भीती असते आपण आवाज उठवला तर आपले नुकसान होईल. ही भीती काही वेळा वास्तवावर आधारित असू शकते; म्हणूनच कोणत्याही कर्मचाऱ्याने अविचारी किंवा बेकायदेशीर मार्ग स्वीकारणे योग्य नाही. परंतु भीतीमुळे आयुष्यभर अन्याय सहन करणेही योग्य नाही. प्रश्न आहे तो संघर्षाच्या पद्धतीचा. संविधान, कायदा, सेवा नियम, उपलब्ध तक्रार निवारण व्यवस्था आणि लोकशाही मार्गांचा वापर करून आपल्या हक्कांसाठी उभे राहणे हा जागृत नागरिकाचा मार्ग आहे.

प्रश्न विचारणे म्हणजे बंडखोरी नव्हे. उलट प्रश्न विचारण्याची क्षमता ही लोकशाहीची ताकद आहे. 'हा निर्णय का झाला?', 'हा नियम सर्वांसाठी समान आहे का?', 'माझ्या हक्कांबाबतची प्रक्रिया काय आहे?', 'माझ्या तक्रारीचे निवारण कोणत्या पद्धतीने होईल?' असे प्रश्न व्यवस्था अधिक पारदर्शक बनवतात. प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीला त्रासदायक मानण्याऐवजी त्याच्या प्रश्नाला उत्तर देण्याची संस्कृती निर्माण होणे आवश्यक आहे. कारण ज्या व्यवस्थेत प्रश्न विचारण्यास भीती वाटते, त्या व्यवस्थेत पारदर्शकतेचा अभाव निर्माण होण्याची शक्यता असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मूलमंत्र 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा ठरतो. शिक्षण म्हणजे केवळ प्रमाणपत्र मिळवणे नव्हे. शिक्षण म्हणजे विवेक जागवणे, योग्य-अयोग्य यातील फरक ओळखणे आणि स्वतःच्या अधिकारांची जाणीव करून घेणे. संघटन म्हणजे कोणाविरुद्ध द्वेष निर्माण करणे नव्हे; तर न्याय्य प्रश्नांसाठी एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे. संघर्ष म्हणजे हिंसा नव्हे; तर कायदेशीर आणि संविधानिक मार्गाने अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे.समाजातील प्रत्येक व्यक्तीने हे समजून घेणे गरजेचे आहे की, अन्याय केवळ पीडित व्यक्तीची समस्या नसते. आज दुसऱ्यावर झालेला अन्याय उद्या आपल्यापर्यंत पोहोचू शकतो. एखाद्या कर्मचाऱ्याचा हक्क डावलला जात असताना इतरांनी मौन बाळगले, तर अन्यायाला अप्रत्यक्षपणे बळ मिळते. म्हणूनच सामाजिक संवेदनशीलता म्हणजे केवळ गरिबांना मदत करणे नाही; तर अन्याय होत असताना योग्य बाजूने उभे राहण्याचे धैर्यही होय.

मात्र या संघर्षात विवेक हरवता कामा नये. प्रत्येक मतभेदाला अन्याय समजणे किंवा प्रत्येक प्रशासकीय निर्णयाला दडपशाहीचे स्वरूप देणेही योग्य नाही. लोकशाहीमध्ये निर्णय, मतभेद, चर्चा आणि कायदेशीर प्रक्रिया या सर्वांना स्थान आहे. त्यामुळे परिवर्तनाच्या लढ्याला तथ्य, पुरावे, कायदा आणि संयम यांची जोड असली पाहिजे. भावनेतून निर्माण झालेला उद्रेक क्षणिक असू शकतो; पण विचारातून उभा राहिलेला संघर्ष दीर्घकालीन परिवर्तन घडवू शकतो.खरे बंड हे प्रथम मनात सुरू होते.

अज्ञानाविरुद्ध ज्ञानाचे बंड, भीतीविरुद्ध आत्मविश्वासाचे बंड, अन्यायाविरुद्ध न्यायाचे बंड, अपमानाविरुद्ध आत्मसन्मानाचे बंड आणि अंधानुकरणाविरुद्ध विवेकाचे बंड यातून समाज पुढे जातो. हातात शस्त्र घेणे हा संघर्षाचा मार्ग नाही; हातात संविधान, डोक्यात विवेक आणि मनात आत्मसन्मान घेऊन उभे राहणे ही खरी सामाजिक क्रांती आहे.

आजच्या काळात प्रत्येकाने स्वतःला काही प्रश्न विचारण्याची गरज आहे. मी माझ्या हक्कांबद्दल किती जागरूक आहे? माझ्यावर अन्याय झाला तर मी योग्य मार्गाने दाद मागू शकतो का? माझ्या सहकाऱ्यावर अन्याय होत असताना मी त्याच्या पाठीशी उभा राहतो का? चुकीची गोष्ट केवळ 'सगळेच करतात' म्हणून स्वीकारतो का? माझ्या मुलांना मी केवळ यश मिळवण्याचे शिक्षण देतो की सत्य, न्याय आणि आत्मसन्मानासाठी उभे राहण्याचे धैर्यही देतो?या प्रश्नांची उत्तरे सोपी नसतील. कारण जाणीव निर्माण झाली की स्वतःकडे पाहण्याची वेळ येते. वर्षानुवर्षे अन्याय सहन करणारा माणूस जेव्हा एक दिवस आरशासमोर उभा राहतो, तेव्हा त्याला स्वतःच्या चेहऱ्यापेक्षा स्वतःची गप्प राहिलेली वर्षे दिसू लागतात. 'मी का सहन केले? मी प्रश्न का विचारला नाही? माझा आवाज मीच का दाबून ठेवला?' हे प्रश्न त्याला अस्वस्थ करतात. पण ही अस्वस्थता नकारात्मक नसते. ती जागृतीची सुरुवात असते.

कारण गुलामीची जाणीव होणे म्हणजे पराभव नाही; उलट तो पहिला विजय असतो. ज्या क्षणी माणूस आपल्या परिस्थितीला प्रश्न विचारतो, त्या क्षणी तो मानसिक गुलामीच्या चौकटीबाहेर पाऊल ठेवतो. त्याला जाणवते की परिस्थिती कठीण असली तरी आपण असहाय नाही. कायदा आहे, संविधान आहे, न्यायव्यवस्था आहे, संवादाचे मार्ग आहेत आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वतःचा विवेक आहे.म्हणूनच आज गरज आहे ती केवळ व्यवस्था बदलण्याची नव्हे, तर माणसाच्या विचारांची दिशा बदलण्याची. प्रत्येक कर्मचाऱ्याने स्वतःचा हक्क जाणून घ्यावा, कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे, चुकीच्या गोष्टींना प्रश्न विचारावा आणि अन्यायाविरुद्ध संविधानिक मार्गाने उभे राहावे. प्रत्येक संस्थेनेही आपल्या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे शत्रुत्वाच्या नजरेने नव्हे, तर सुधारण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे.

समाजात परिवर्तन तेव्हाच घडते जेव्हा भीतीच्या जागी जाणीव येते. जाणीवेतून प्रश्न जन्माला येतो. प्रश्नातून विचार निर्माण होतो. विचारातून आत्मसन्मान जागतो आणि आत्मसन्मान जागा झाला की माणूस अन्यायापुढे कायमचा झुकत नाही. म्हणून बाबासाहेबांचे हे विचार आज पुन्हा पुन्हा उच्चारण्याची गरज आहे"गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या..." कारण ज्याला आपल्या गुलामीची जाणीवच नाही, तो स्वातंत्र्याची किंमत कशी ओळखणार? ज्याला आपल्या हक्कांची जाणीव नाही, तो न्यायाची मागणी कशी करणार? आणि ज्याच्या मनात आत्मसन्मान जागा झालेला नाही, तो अन्यायाविरुद्ध उभा कसा राहणार?

आजचा खरा संघर्ष कोणाविरुद्ध नसून त्या मानसिकतेविरुद्ध आहे जी माणसाला गप्प बसवते. हा संघर्ष द्वेषाचा नसून न्यायाचा आहे. हा संघर्ष हिंसेचा नसून विचारांचा आहे. हा संघर्ष व्यक्तीला संपवण्याचा नसून व्यवस्थेला अधिक न्याय्य बनवण्याचा आहे.

शेवटी एवढेच एखादा माणूस गप्प राहतो म्हणून अन्याय संपत नाही; तो फक्त पुढे ढकलला जातो. एखादा कर्मचारी भीतीपोटी मान खाली घालतो म्हणून समस्या सुटत नाही; ती अधिक खोलवर जाते. पण एक दिवस तोच कर्मचारी आत्मसन्मानाने उभा राहून म्हणतो, "मी अन्याय करणार नाही आणि माझ्यावर किंवा दुसऱ्यावर अन्याय होत असेल तर योग्य, कायदेशीर आणि संविधानिक मार्गाने त्याविरुद्ध आवाज उठवेन," तेव्हा परिवर्तनाची खरी सुरुवात होते.

कदाचित त्या क्षणी मोठी क्रांती घडणार नाही. कदाचित व्यवस्था एका दिवसात बदलणार नाही. पण एका माणसाच्या मनात पेटलेली जाणीवेची छोटी ज्योत दुसऱ्याच्या मनात प्रकाश निर्माण करू शकते. त्या प्रकाशातून अनेक प्रश्न जन्माला येऊ शकतात आणि त्या प्रश्नांतून समाजाच्या परिवर्तनाची वाट तयार होऊ शकते.म्हणून गुलामीच्या साखळ्या तोडण्यापूर्वी मनातील भीती तोडा. हक्क मागण्यापूर्वी हक्कांची जाणीव करून घ्या.आणि संघर्ष करण्यापूर्वी संविधानाचा मार्ग ओळखा.कारण जागा झालेला माणूस केवळ स्वतःचे आयुष्य बदलत नाही; तो आपल्या सभोवतालच्या समाजालाही जागे करण्याची ताकद निर्माण करतो.

हीच गुलामीच्या जाणीवेची खरी ताकद आणि हीच बाबासाहेबांच्या विचारांची अमर ज्योत आहे.

लेखक
समाजभूषण रामदास वच्छलामाई रखमाजी वाघमारे
छत्रपती संभाजीनगर
मो.नं. 8888125610

## स्मार्ट मीटर बसविण्यास विरोध; पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांचे महावितरणला निवेदन



**शिवना, ता. सिल्लोड :** ग्रामीण भागातील वीज ग्राहकांच्या हिताचा विचार करून नवीन स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया थांबवावी, अशी मागणी पंचायत समिती सदस्य शेख सलीम शेख भिकन यांनी महावितरणकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शिवना व परिसरातील वीज ग्राहकांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात स्मार्ट मीटर बसविण्याबाबत ग्राहकांमध्ये असलेल्या विविध अडचणी व संभ्रमाकडे महावितरणचे लक्ष वेधण्यात आले. ग्राहकांच्या हिताचा योग्य विचार करून स्मार्ट मीटर बसविण्याची कार्यवाही करू नये, अशी मागणी शेख सलीम यांनी केली.

दरम्यान, ज्या ग्राहकांच्या घरांवर अद्याप नवीन स्मार्ट मीटर बसविण्यात आलेले नाहीत, त्यांनी याबाबत माहिती घेऊनच पुढील कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच ज्या ग्राहकांचे स्मार्ट मीटर यापूर्वीच बसविण्यात आले आहेत, त्यांनी पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांच्या कार्यालयात जाऊन त्यांच्याशी संपर्क साधावा, असेही सूचित करण्यात आले आहे.

ग्राहकांच्या वीजविषयक समस्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्नशील असून, कोणत्याही ग्राहकाने घाबरून जाऊ नये, असे आवाहन शेख सलीम यांनी केले आहे.

## नवनिर्वाचित परिविक्षाधिन तहसीलदार सागर वाघमारे यांचा सत्कार




**अजींठा प्रतिनिधी :** आज सिल्लोड तालुका स्वस्त धान्य दुकानदार केरोसीन परवानाधारक संघटनेचे तालुकाध्यक्ष रफिक शेरखान यांच्या नेतृत्वाखाली नवनिर्वाचित परिविक्षाधिन तहसीलदार सागर वाघमारे यांची भेट घेऊन प्रथम सत्कार करण्यात आले व निवेदन देण्यात आले निवेदनात या महिन्यात आम्हाला सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्याचे धान्य दुकानदार यांना देण्यात येत आहेत पण EPOS मशीन वर अजून धान्य साठा देण्यात आले नाहीत खरे म्हणजे जे नियतन आमच्या दुकानात उपलब्ध करून देण्यात आले आहे ते वितरण व्यवस्था मध्ये उपलब्ध करून देण्यात यावे म्हणजे सोईचे होईल ऑनलाईन मध्ये एकच महिन्याचे धान्य वितरण व्यवस्था दिसत आहे तरी आपल्या स्तरावर प्रयत्न करून जसे दोन महिन्याचे धान्य दुकानदार यांच्या कडे उपलब्ध करून देण्यात आले आहे ते वितरण व्यवस्था ही देण्यात यावे व त्वरित द्यावी म्हणजे आलेल्या धान्य वितरण लाभार्थ्यांना वेळत करता येईल.तसेच माहे जून ते आगस्ट धान्य वितरण कमीशन रक्कम दुकानदार यांच्या खात्यात जमा करून देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहेत या वेळी तालुका पुरवठा निरीक्षक अधिकारी बळीराम मुंडे, सहाय्यक पुरवठा निरीक्षक आशिष औटी, लिपिक सौरव सोनवलकर यांच्या उपस्थितीत तालुकाध्यक्ष

रफिक शेरखान पठाण , उपाध्यक्ष राधेश्याम कुलवाल, मधुकर बर्डे , सचिव पंडित पारधे,सलीम बागवान, जितेंद्र माहोर ,पंडित गोडसे , इक्बाल बापू यांच्या सह दुकानदार बंधु उपस्थित होते.

## गतिरोधकाच्या मागणीसाठी पुंगळा ग्रामस्थांचा रास्ता रोको



**जिंतूर, दि. १० :** जिंतूर-औंढा महामार्गावरील पुंगळा गावाजवळ गतिरोधक नसल्याने झालेल्या अपघातात सात वर्षीय विठ्ठल जगताप या चिमुकल्याचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी गुरुवारी सकाळी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले.

ग्रामस्थांनी यापूर्वी अनेक वेळा संबंधित विभागाकडे गतिरोधक बसविण्याची मागणी केली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष झाल्याने हा दुर्दैवी अपघात घडल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. तसेच रस्ते विकास महामंडळाचे संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली.

आंदोलनाची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी, नायब तहसीलदार प्रशांत राखे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता शिवाजी बोरकर यांनी घटनास्थळी भेट दिली. संबंधित विभागाशी संपर्क साधून गतिरोधकाची मागणी लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने नायब तहसीलदार प्रशांत राखे यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले असून तातडीने उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

## एसबीआय लाईफकडून गौरव

नवी दिल्ली: पदक जिंकल्यानंतर सारं जग त्या विजयाच्या क्षणाचा साक्षीदार होतं; मात्र त्या पदकामागील प्रवासासाठी अनेक वर्षे लागलेली असतात. त्यासाठी सुरुवात करण्याचे धैर्य, पुढे वाटचाल सुरू ठेवण्याची जिद्द, अडथळ्यांवर मात करण्याचा आत्मविश्वास आणि अनेकदा कुटुंबीय, प्रशिक्षक व आप्तस्वकीयांचा मूक पाठिंबा आवश्यक असतो. जगाला व्यासपीठावर त्या आकांक्षेचे दर्शन होण्याच्या कितीतरी आधीपासून तिच्या पाठीशी ते ठामपणे उभे असतात. ग्लासगो 2026 राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये भारताने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमागील या कहाण्यांची दखल घेत, एसबीआय लाईफ इन्श्युरन्सने पॅरालिम्पिक कमिटी ऑफ इंडिया (PCI) सोबत भारतासाठी तीन सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्य अशी सात पदके घेऊन आलेल्या भारतीय पॅरा-क्रीडापटूंचा सत्कार केला.

# कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या नेतृत्वात वनामकृविच्या करडई वाणांचा राष्ट्रीय ब्रीडर बियाणे वाटपात दबदबा

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

भारत सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या तेलबिया विभागामार्फत रब्बी २०२६–२७ हंगामासाठी करडईसह विविध तेलबिया पिकांच्या ब्रीडर बियाणे वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. बियाण्याची गुणवत्ता, बियाणे वितरणाचा मागोवा घेण्याची व्यवस्था तसेच निर्धारित मुदतीत बियाणे उचलण्याबाबत संबंधित यंत्रणांना निर्देश देण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने (वनामकृवि) करडई पिकाच्या संशोधन आणि ब्रीडर बियाणे उत्पादनाच्या क्षेत्रात पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, संशोधनाला दिलेले सातत्यपूर्ण प्रोत्साहन आणि भक्कम प्रशासकीय पाठबळ यामुळे विद्यापीठाच्या करडई संशोधनाला राष्ट्रीय स्तरावर व्यापक मान्यता मिळत असल्याचे या वाटपातून अधोरेखित झाले आहे.

रब्बी २०२६–२७ हंगामासाठी देशभरात करडई पिकासाठी एकूण १६१.३३ क्विंटल ब्रीडर बियाण्याचे वाटप करण्यात आले आहे. यापैकी तब्बल ८४.५ क्विंटल म्हणजेच ५२.३८ टक्के ब्रीडर बियाणे हे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या करडई वाणांचे आहे. राष्ट्रीय स्तरावरील एकूण ब्रीडर बियाणे वाटपापैकी निम्म्याहून अधिक वाटा वनामकृविच्या वाणांना मिळणे ही विद्यापीठाच्या करडई संशोधनाची राष्ट्रीय स्तरावरील स्वीकारार्हता, गुणवत्ता आणि प्रभाव अधोरेखित करणारी महत्त्वपूर्ण कामगिरी आहे.

वनामकृविच्या करडई वाणांना मिळालेले ब्रीडर बियाणे वाटप

विद्यापीठाने विकसित केलेल्या करडई वाणांमध्ये 'पीबीएनएस १५४' (परभणी सुवर्णा) या सन २०२३ मध्ये अधिसूचित वाणासाठी ४८ क्विंटल, पीबीएनएस १८४ या सन २०२२ मध्ये अधिसूचित वाणासाठी २८.५ क्विंटल, तर 'पीबीएनएस – १२' (परभणी कुसुम) या सन २००७ मध्ये अधिसूचित वाणासाठी ८ क्विंटल ब्रीडर बियाण्याचे वाटप करण्यात आले आहे.

यामध्ये 'परभणी सुवर्णा' या अलीकडेच अधिसूचित झालेल्या वाणाला मिळालेले ४८ क्विंटलचे सर्वाधिक ब्रीडर बियाणे वाटप विशेष उल्लेखनीय आहे. शेतकऱ्यांच्या गरजा आणि बदलत्या हवामानाच्या परिस्थितीचा विचार करून विकसित करण्यात आलेल्या या वाणाला राष्ट्रीय स्तरावर मिळत असलेली मागणी ही त्याची उपयुक्तता आणि स्वीकारार्हता अधोरेखित करणारी आहे.

माननीय कुलगुरू प्रा.(डॉ.) इन्द्र मणि यांच्या नेतृत्वाखाली आणि संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाने संशोधन, गुणवत्तापूर्ण बियाणे निर्मिती आणि शेतकरी-केंद्रित तंत्रज्ञान प्रसाराला सातत्याने प्राधान्य दिले आहे. विद्यापीठ प्रशासन, करडई संशोधनाशी संबंधित शास्त्रज्ञ तसेच बियाणे उत्पादन व संबंधित कामकाजातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समन्वित प्रयत्नांमुळे वनामकृविच्या करडई वाणांना राष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात ब्रीडर बियाणे वाटप मिळणे शक्य झाले आहे.

करडई संशोधनातील या उल्लेखनीय कामगिरीबद्दल माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी करडई संशोधन केंद्रातील सर्व अधिकारी, शास्त्रज्ञ व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले की, वनामकृविच्या करडई वाणांना मिळालेला राष्ट्रीय स्तरावरील हा मोठा वाटा विद्यापीठाच्या 'शेतकरी देवो भव' या भावनेतून सुरू असलेल्या शेतकरीहितैषी, गुणवत्तापूर्ण आणि परिणामकारक कृषि संशोधनाची पावती आहे. भविष्यात हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर करडईसह विविध तेलबिया पिकांसाठी अधिक उत्पादक, गुणवत्तापूर्ण आणि शाश्वत वाण विकसित करण्याच्या विद्यापीठाच्या प्रयत्नांना या यशामुळे निश्चितच बळ मिळेल.

## श्री संचारेश्वर विद्यालयात मातृदिन व बैलपोळा उत्साहात संपन्न



**जिंतूर :** श्री संचारेश्वर प्राथमिक विद्यालय, जिंतूर येथील संस्कार केंद्रामध्ये गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी मातृदिन व बैलपोळ्यानिमित्त विविध उपक्रमांनी भरलेला कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी सोमोसे तर प्रमुख पाहुण्या व वक्त्या म्हणून संपदा देशपांडे उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.शिशुवाटिकेत मोनिका घोडके , शिक्षिका राणूबाई सुग्रामकर व अश्विनी पांडे यांनी चिमुकल्यांकडून नृत्य सादर करवून घेतले. या नृत्यातून चिमुकल्यांनी बळीराजाला मानवंदना दिली.

तसेच विद्यार्थ्यांनी बैल सजवुन आणले आणि विद्यार्थी व विद्यार्थीनी शेतकरी या वेशभूषेत आले आणि विद्यार्थ्यांच्या हस्ते बैल पुजन करण्यात आले.

तसेच इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी मातीचे बैल तयार करून आकर्षक पद्धतीने सजवून आणले. तसेच इयत्ता सातवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी शेतीच्या विविध अवजारांची सचित्र भित्तीपत्रके तयार केली. कागद व पुठ्ठ्याचा वापर करून शेतीच्या अवजारांच्या प्रतिकृतीही विद्यार्थ्यांनी तयार केल्या.

प्रमुख वक्त्या संपदा देशपांडे यांनी मातृदिनाचे महत्त्व तसेच बैलपोळा या सणाची परंपरा, सांस्कृतिक महती आणि शेतीमध्ये बैलांचे असलेले महत्त्व विद्यार्थ्यांना सुंदर व समर्पक शब्दांत समजावून सांगितले.

भारतीय संस्कृतीमध्ये सण-उत्सवांना केवळ आनंदाचे स्वरूप नसून त्यातून निसर्ग, पशुपक्षी, वनस्पती आणि शेतीशी संबंधित घटकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची भावना रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये हीच संस्कारमूल्ये रुजावीत, निसर्गाशी असलेले आपले नाते दृढ व्हावे आणि श्रमसंस्कृतीची जाणीव निर्माण व्हावी, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## सलीम उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज शिवना येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा



**शिवना :** सलीम उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, शिवना येथे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात, जल्लोषात व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या भव्य मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

शाळेच्या नियमित वेळेत सकाळच्या परिपाठापासूनच शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी विद्यार्थी प्राचार्य तथा मुख्याध्यापिका मंतशा शेख नदीम यांनी विद्यार्थी-शिक्षकांसोबत विद्यार्थ्यांचा परिपाठ घेतला. विद्यार्थी-शिक्षकांनी पूर्वतयारी करून तसेच आपल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वर्गनिहाय विविध विषयांच्या तासिका अत्यंत नियोजनबद्ध व शिस्तबद्ध पद्धतीने घेतल्या. या दिवशी शिक्षकांनी अध्यापन करण्याऐवजी निरीक्षक व मार्गदर्शकाची भूमिका पार पाडली. शाळेचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक मोहम्मद शाकीर सर यांनी विद्यार्थी प्राचार्य तथा मुख्याध्यापिका मंतशा शेख नदीम यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व त्यांना प्राचार्यांच्या आसनावर विराजमान केले. विद्यार्थी-शिक्षक आपापल्या विषयांच्या तासिका घेताना त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह व आत्मविश्वास दिसून येत होता.

दुपारी ठीक ३ वाजता शाळेच्या भव्य मैदानावर शिक्षक दिनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी शिवना केंद्राचे केंद्रमुख्याध्यापक रोहिले सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांचे स्वागत प्राचार्य तथा मुख्याध्यापक मोहम्मद शाकीर सर यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.

कार्यक्रमात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन का साजरा केला जातो, शिक्षकांची समाजातील भूमिका, त्यांच्या जबाबदाऱ्या तसेच देशाच्या प्रगतीमध्ये शिक्षकांचे योगदान या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषणे केली. विद्यार्थी प्राचार्य तथा मुख्याध्यापिका मंतशा शेख नदीम यांनीही शिक्षकांची जबाबदारी, शाळेतील शिस्त व शिष्टाचार आणि विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे महत्त्व याबाबत आपले विचार व्यक्त केले. यावेळी प्राचार्य तथा मुख्याध्यापक मोहम्मद शाकीर सर यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना शिक्षकांचे स्थान आणि भारतीय संस्कृतीशी असलेले शिक्षकांचे अतूट नाते यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेहरीन मोहम्मद अन्सारी व मदिहा मोहम्मद शाकीर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. त्यांच्या उत्कृष्ट निवेदनामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. विद्यार्थी-शिक्षक, शिक्षक व शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या नियोजनबद्ध सहभागामुळे शिक्षक दिनाचा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण व संस्मरणीय ठरला.

## आदित्य यशवंत घरत यांची उरण तालुका काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी निवड

### "पक्षाने दाखविलेला विश्वास जनसेवा आणि संघटनबांधणीतून सार्थ ठरवू" — आदित्य घरत

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण रायगड




उरण तालुका काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ,कट्टर,प्रामाणिक कार्यकर्ते, कामगार नेते, काँग्रेसचे जेष्ठ नेते महेंद्रशेठ घरत यांचे अत्यंत जवळचे विश्वासू सहकारी म्हणून कार्यरत असलेले आदित्य यशवंत घरत यांची निवड करण्यात आली आहे.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्रशेठ घरत यांच्या शुभ हस्ते आदित्य घरत यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.या निवडीबद्दल आदित्य घरत यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्रशेठ घरत यांचे तसेच सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

"माझी उपाध्यक्षपदी निवड करून माझ्यावर विश्वास व्यक्त केल्याबद्दल मी दोन्ही मान्यवरांचा मनःपूर्वक आभारी आहे. ही निवड माझ्यासाठी केवळ पदाची जबाबदारी नसून काँग्रेस पक्षाची विचारधारा, लोकशाही मूल्ये आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा आहे," अशी भावना आदित्य घरत यांनी व्यक्त केली.

उरण तालुक्यात काँग्रेस पक्षाची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी, जनतेच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी तसेच समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि सातत्याने कार्यरत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

"माझ्यावर दाखविलेला विश्वास जनसेवा, संघटनबांधणी आणि लोकहिताच्या कार्यातून सार्थ ठरविण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेन. आपला विश्वास, आपले मार्गदर्शन आणि जनतेची साथ हीच माझी खरी ताकद आहे," असा विश्वासही आदित्य यशवंत घरत यांनी व्यक्त केला. काँग्रेस पक्षाचा, पक्षाच्या ध्येय धोरणाचा आदित्य घरत यांनी तळागाळात प्रचार व प्रसार केला असून पक्षासाठी रात्रंदिवस झटणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. कट्टर एकनिष्ठ व प्रामाणिक कार्यकर्ते असल्यामुळे आदित्य घरत यांची उरण तालुका काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्ष पदी निवड झाली आहे. या निवडीमुळे उरण तालुका काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आदित्य घरत यांच्या पुढील वाटचालीसाठी विविध स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## जिंतूरमध्ये पोळा सण उत्साहात; बैलजोड्यांची आकर्षक मिरवणूक



**जिंतूर, दि. __ :** शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा आणि कृषी संस्कृतीचे प्रतीक मानला जाणारा पोळा सण जिंतूर शहरात पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील मोठा मारुती मंदिर परिसरातून निघालेल्या सजविलेल्या बैलजोड्यांच्या मिरवणुकीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शहरासह परिसरातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी आपल्या बैलांची आकर्षक सजावट केली होती. रंगीबेरंगी झुली, गोंडे, घंटा, फुलांच्या माळा आणि पारंपरिक अलंकारांनी सजलेल्या बैलजोड्या मोठा मारुती मंदिरात आणण्यात आल्या. तेथे विधिवत पूजा करून मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. ही मिरवणूक शहरातील मुख्य बाजारपेठेतून काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान नागरिकांनी मोठ्या उत्साहाने उपस्थित राहून सजविलेल्या बैलांचे दर्शन घेतले.

पोळा सणाचे विशेष महत्त्व म्हणजे शेतकरी आपल्या शेतीतील खऱ्या सहकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. वर्षभर शेतीच्या कामात साथ देणाऱ्या बैलांची पूजा करून त्यांना विश्रांती दिली जाते. यावेळी शेतकऱ्यांनी नांगर, वखर, कुळव यांसह विविध पारंपरिक शेती अवजारांचीही विधिवत पूजा केली.

ग्रामीण संस्कृती, परंपरा आणि कृषी जीवनाचा वारसा जपणारा हा सण शेतकरी वर्गासाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो. बदलत्या आधुनिक युगातही पोळा सणाची परंपरा कायम राखली जात असल्याने ग्रामीण संस्कृतीचे जतन होत असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

## संत निरंकारी मंडळातर्फे शिवना येथे वक्षारोपण: पर्यावरण संवर्धनाचा दिला संदेश



**अजींठा प्रतिनिधी :** संत निरंकारी मिशनच्या सद्गुरू माता सुदीक्षा महाराज यांच्या आदेशानुसार 'वननेस वन' या पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन, ब्रॅच शिवना यांच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र, शिवना येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमाचा उद्देश पर्यावरणाचे संवर्धन, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती करणे हा होता. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अरुण पाटील काळे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात विविध रोपांची लागवड करण्यात आली.

यावेळी ब्रॅच प्रमुख कैलास धोंडकर, सेवादल शिक्षक महात्मा संदीप उबाळे, संचालिका गीतांजली सोनवणे यांच्यासह संत निरंकारी मिशनचे सेवादल महापुरुष उपस्थित होते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून लावलेल्या झाडांचे संगोपन करणे गरजेचे असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युनिट क्रमांक १८५१ मधील सर्व सेवादल महापुरुषांनी विशेष योगदान दिले. कार्यक्रमाच्या शेवटी ब्रॅच प्रमुख कैलास धोंडकर यांनी उपस्थित मान्यवर, सेवादल महापुरुष व सर्व सेवेकऱ्यांचे आभार मानले.

## सावळदबारा येथे पोळा सण साजरा



**सावळदबारा :** बैल पोळा सण हा बळीराजासाठी अत्यंत महत्वाचा सण मानला जातो. या दिवशी वर्षभर शेतात राबणारी बैलांचे पुजन करुन त्यांना सजवणे, गावातून मिरवणे असे करुन हा बैलपोळा सण साजरा करतात. सावळदबारा येथे मोठ्या उत्साहात हा सण साजरा करण्यात आला. यावेळी येथील शेतकरी भारतीय जनता पार्टीचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील यांच्यासह अनेकांनी बैलाचे औक्षण करुन बैलांची सजावट करुन गावातून मिरवणुक काढली. यावेळी त्यांच्या परिवारातील संगिता कोलते, संदीप कोलते,लव कोलते,आयुष कोलते,विशाल खडके,श्याम कर्दळे,यश टिकारे, प्रसाद टिकारे आदी मंडळी उपस्थित होते.

# बैलांच्या राजशाही थाटाने आणि भक्तांच्या उत्सवाने फुलला पोळा सोहळा

फर्दापूर प्रतिनिधी शेख हक्कानी

फर्दापूर जगप्रसिद्ध अजिंठा लेणींच्या ऐतिहासिक पाऊलखुणांनी नटलेल्या फर्दापूर नगरीत कष्टकरी शेतकऱ्यांच्या जिवाभावाचा सखा सोयरा वर्षभर खांद्याला खांदा लावून साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा पोळा सण यावर्षी अधिकच गोड आणि मसालेदार थाटात साजरा झाला

या सणाला फर्दापूरच्या निसर्गसौंदर्याने आणि ऐतिहासिक वारशाने जणू भक्तीचा गोड मसाला लावला होता भल्या पहाटेपासूनच गावातील शेतकऱ्यांच्या घरात आणि गोठ्यात उत्साह ओसंडून वाहत होता

शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या बैलांना अगदी लेकासारखा लाड करत नदीवर नेऊन पहाटेच्या आंघोळीचा आनंद दिला त्यानंतर बैलांना इंद्रधनुषी रंगांनी सजवून गोंडे झुली आणि विविध साहित्यांनी



त्यांची राजशाही थाटात पूजा करण्यात आली हे सजलेले बैल पाहताना 'देव आले हो बैलांच्या रूपानं' अशीच भावना फर्दापूरकरांच्या मनात जागी झाली

भक्तीचा गोड मसाला नैवेद्याचा गोडवा

नैवेद्याच्या वेळी बैलांच्या समोर पुरणपोळीचा गोडवा आणि विविध पक्वान्नांचा सुवास दरवळत होता या गोडव्यात शेतकऱ्यांच्या कष्टाचा आणि भक्तीचा 'मसाला' लागला होता वर्षातून एकदाच येणाऱ्या या सणामुळे शेतकरी कुटुंबांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते

गावागावांत धुमशान उत्सवाचा उत्साह

पोळ्याच्या ठिकाणी बैलांची तसेच नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली वाद्यांचा गजर गुलालाची उधळण आणि शेतकऱ्यांचा गर्जो मराठी असा आवाज फर्दापूरच्या डोंगररांगांमध्ये घुमत होता

सांस्कृतिक वारसा पोळ्याचे महत्त्व

बैलाच्या कष्टाचे आणि शेतकऱ्याच्या आयुष्यातील त्याच्या स्थानाचे वर्णन अधिक भावूक झाले ऐतिहासिक लेण्यांच्या सावलीत साजरा झालेला हा पोळा फर्दापूरच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची आणि निसर्गाशी असलेल्या अतूट नात्याची साक्ष देत होता स्थानिक लोकांच्या प्रतिक्रिया आणि त्यांच्या भावना या उत्सवाला अधिक 'गोड' आणि 'मसालेदार' बनवत होत्या

हा सण फक्त बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा नव्हता तर सामाजिक एकतेचा आणि भक्तीचा संदेश देणारा होता

## आरोग्य शिबिर आयोजनासाठी गणेश मंडळांना संपर्क करावा : जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी, :-** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना आरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ‘श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६’ राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील नोंदणीकृत गणेश मंडळांच्या ठिकाणी सामुदायिक आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

अभियानांतर्गत आरोग्य शिबिर घेण्यास इच्छुक असलेल्या सर्व नोंदणीकृत गणेश मंडळांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी मा.संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे. मुख्यमंत्री सचिवालयाच्या अधिनस्त मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत हे अभियान राबविण्याचे प्रस्तावित आहे.

गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येत असल्याने त्याच ठिकाणी आरोग्य तपासणी व आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. या अभियांनांतर्गत जनरल मेडिसिन व हृदय रोग, मधुमेह, त्वचाविकार, अस्थीरोग, पोटविकार, स्त्रीरोग, बालरोग व नेत्रतपासणी तज्ञ डॉक्टरा द्वारे केल्या जाणार आहेत. तसेच रक्तदाब, ब्लडशुगर, ECG या तपासण्या केल्या जाणार आहेत व आवश्यक औषधी पुरवठा करण्यात येणार आहे. तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

या शिबिरांसाठी विविध शासकीय विभाग व यंत्रणांसह जिल्ह्यातील सेवाभावी सामाजिक संस्था, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये तसेच रुग्णालयांचे सहकार्य घेतले जाणार आहे. त्याद्वारे वैद्यकीय अधिकारी, पॅरामेडिकल कर्मचारी, आवश्यक निदानात्मक व उपचारात्मक साधने-साहित्य आणि पुरेशा प्रमाणात औषधांची उपलब्धता करून देण्यात येणार आहे.

## जनतेच्या हक्काच्या विविध मागण्यां चे रिपाइंचे तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदनची दखल घ्या : फकीरराव भालेराव

खुलताबाद तालुक्यातील जनतेच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)च्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदारांमार्फत निवेदन देण्यात आले. तालुक्यातील गायरान व वनजमीन धारक, शेतकरी, रेशनकार्डधारक तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या विविध मागण्यांची तातडीने दखल घेऊन शासनस्तरावर निर्णय घेण्याची मागणी निवेदनातून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे आठवले गट तालुका अध्यक्ष फकीरराव भालेराव यांनी केली आहे करण्यात आली आहे.



निवेदनात गायरान अतिक्रमणधारकांच्या जमिनींचे पट्टे नियमानुकूल करून सातबारा उताऱ्यावर नोंद करावी, तसेच वनजमीन धारकांच्या वनजमिनींचे पट्टे नियमानुकूल करून त्यांच्या सातबारा उताऱ्यावर नोंद घेण्याची मागणी करण्यात आली आहे. नवीन रेशनकार्डधारकांना धान्याचा लाभ मिळावा आणि शेतकरी रेशनकार्डधारकांना शासनाचे अनुदान मिळावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

प्रत्येक कुटुंबातील ६० वर्षांवरील व्यक्तींना अटल पेन्शन योजनेचा लाभ देण्यात यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली. तसेच महात्मा फुले विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास विकास महामंडळ आणि इतर मागासवर्गीय विकास महामंडळांकडून लाभार्थ्यांनी घेतलेली कर्जे माफ करण्याची मागणी करण्यात आली आहे.

खुलताबाद तालुक्यातील भोगवटदार वर्ग-२ जमीनधारक शेतकऱ्यांना तांत्रिक त्रुटींमुळे रखडलेले ॲग्रिस्ट फार्मर आयडी तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही करण्यात आली. गायरान व वनजमीन धारकांच्या सातबारा उताऱ्यावर असलेल्या पोटखराब क्षेत्राच्या नोंदी तातडीने दुरुस्त करून संबंधित जमिनीचे क्षेत्र व आकार निश्चित करावा. तसेच संबंधित जमीनधारकां फार्मर आयडी मिळवून देऊन पीककर्जाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

या सर्व प्रश्नांची गंभीर दखल घेऊन मागण्यांची शासनस्तरावर तातडीने अंमलबजावणी करावी, अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन, मोर्चे व निदर्शने करण्यात येतील, असा इशाराही निवेदनातून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे तालुका अध्यक्ष फकीरराव भालेराव यांच्यासह पार्टीच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## आवास योजनेच्या लाभासाठी महापालिका आयुक्तांचा मोठा दिलासा; दहा टक्के रकमेपैकी 50 टक्के भरण्यास 10 दिवसांची मुदत, उर्वरित रकमेसाठी 30 दिवसांचा अवधी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पडेगाव ,हर्सूल, सुंदरवाडी, तिसगाव येथे सुरू असलेल्या गृहप्रकल्पाची महानगरपालिका आयुक्तांनी आज प्रत्यक्ष पाहणी केली. वेळोवेळी झालेल्या बैठका आणि मार्गदर्शनानुसार एकूण प्राधान्यक्रमाच्या ३४०८ घरांपैकी २०४० घरांसाठी नागरिकांनी १० टक्के रक्कमेचा भरणा केला आहे. नागरिकांचा हा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता आणि ३० सप्टेंबर पूर्वी योजनेची अंमलबजावणी पूर्ण करून लाभार्थी निश्चित करणे आवश्यक असल्याने, आयुक्तांनी उर्वरित १३६८ लाभार्थ्यांच्या प्रक्रियेबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

सध्या ही सर्व घरकुले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांसाठी असून, १० दिवसांच्या अल्प कालावधीत १० टक्के रक्कम (अंदाजे ९० हजार ते १ लाख रुपये) गोळा करणे अशक्य असल्याचे लक्षात घेऊन माननीय आयुक्त अमोल येडगे यांनी प्रशासनाला महत्त्वाचे आदेश दिले. त्यानुसार, संबंधित नागरिकांनी १० दिवसांच्या आत १० टक्के रकमेच्या निम्मी (५०%) रक्कम भरल्यास ती स्वीकारण्यात यावी आणि पुढील २० दिवसांत म्हणजेच एकूण ३० दिवसांच्या कालावधीत उर्वरित रक्कम भरण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना त्यांनी केली. या निर्णयामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांना स्वतःचे घर मिळवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मोठा दिलासा मिळाला आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी महापालिका प्रशासनाने पात्र नागरिकांसाठी विशेष आवाहन केले आहे. यापूर्वी ज्या नागरिकांनी या योजनेत अर्ज केला होता, परंतु पैशांअभावी किंवा इतर कारणांमुळे विजेता घोषित होऊनही रक्कम भरू शकले नाहीत आणि त्यामुळे घर मिळण्यापासून वंचित राहिले, अशा नागरिकांना तसेच वेटिंग लिस्टवर मोठ्या प्रमाणावर असलेल्या नॉन-विनर नागरिकांनाही या योजनेचा लाभ घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. ज्या नागरिकांची पुढील १० दिवसांमध्ये १० टक्के रकमेच्या अर्धी रक्कम भरण्याची तयारी आहे, त्यांनी लवकरात लवकर मनपाच्या प्रधानमंत्री आवास योजना विभागाशी संपर्क साधून आपण लाभार्थी होण्यास इच्छुक असल्याबाबतचा अर्ज सादर करावा, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. सध्या महानगरपालिकेकडे उर्वरित विजेत्यांची संख्या २४२१ इतकी असून, प्राधान्यक्रमाने निश्चित केलेल्या घरकुलांची रिक्त संख्या केवळ १३६८ एवढीच आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि जे नागरिक प्रथम अर्ज करतील व कागदपत्रांची पूर्तता करतील, त्यांना प्राधान्यक्रमाने घरांचे अलॉटमेंट केले जाईल, असे स्पष्ट करण्यात आले.

## नायगावमध्ये वीजदुरुस्तीवेळी मोठी दुर्घटना; महावितरणचा 'झिरो वायरमन' विजेचा शॉक लागून गंभीर जखमी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** हर्सूल नायगाव येथे वीज दुरुस्तीचे काम करत असताना महावितरणचा झिरो वायरमन विजेचा तीव्र धक्का बसून गंभीररीत्या भाजल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. घडलेल्या या अपघातात जखमी झालेल्या वायरमनवर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

इलियास शेख (वय अंदाजे ४५, रा. नायगाव) असे गंभीर जखमी झालेल्या झिरो वायरमनचे नाव असल्याचे गावातील सूत्रांनी सांगितले आहे. या घटनेबाबत माहिती देताना सावंगीचे महावितरणचे अभियंता प्रदीप गव्हांदे यांनी सांगितले की, दुरुस्तीचे काम सुरू असताना सुरुवातीला वीजप्रवाह बंद होता, मात्र अचानक वीजप्रवाह पूर्ववत झाल्यामुळे (परतल्यामुळे) हा भीषण अपघात घडला.

या अचानक घडलेल्या दुर्घटनेमुळे इलियास शेख यांच्या गरीब कुटुंबावर मोठे आर्थिक व मानसिक संकट कोसळले आहे. महावितरण प्रशासनाकडून पीडित कुटुंबास तात्काळ आर्थिक मदत मिळायला हवी, अशी तीव्र मागणी नागरिकांमधून होत आहे. तसेच, दुरुस्तीच्या कामासाठी पोलवर चढण्यापूर्वी संबंधित कर्मचाऱ्याला किंवा झिरो वायरमनला आवश्यक ती सर्व सुरक्षा साधने पुरवली होती का? असा गंभीर प्रश्न या निमित्ताने निर्माण झाला आहे. अलीकडच्या काळात महावितरणचे नियमित वायरमन अनेकदा अशा अप्रशिक्षित आणि हंगामी 'झिरो वायरमन'ना जीवरक्षक आणि जोखमीच्या कामांसाठी पुढे ढकलतात, आणि याच निष्काळजीपणामुळे अशा दुर्घटना वारंवार घडत असल्याचा गंभीर आरोप संतप्त ग्रामस्थांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेऊन निष्काळजीपणा दाखवणारे व कामचुकार वायरमन तसेच संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नायगाव परिसरातील नागरिकांमधून केली जात आहे.

## शोभायात्रेने होणार युवक महोत्सवाचा प्रारंभ; 11 व 12 सप्टेंबर रोजी दिमाखदार आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा यंदाचा जिल्हास्तरीय युवक महोत्सव शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात ११ व १२ सप्टेंबर रोजी उत्साहात संपन्न होणार आहे. या महोत्सवाचे यजमानपद शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयास मिळाले असून, महोत्सवाची सुरुवात भव्य आणि आकर्षक शोभायात्रेने होणार आहे. या महोत्सवात जिल्ह्यातील सुमारे ५० महाविद्यालयांचे संघ सहभागी होणार आहेत.

युवक महोत्सवाचा उद्घाटन सोहळा महाविद्यालयाच्या 'वंदे मातरम सभागृहात' आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवार (दि. ११) रोजी सकाळी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री मा. ना. अतुल सावे यांच्या हस्ते या महोत्सवाचे दिमाखदार उद्घाटन होईल. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. या उद्घाटन सोहळ्यास आमदार प्रदीप जैस्वाल, महापौर समीर राजुरकर तसेच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व आमदार विक्रम काळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या महोत्सवाची खरी पर्वणी ठरणाऱ्या शोभायात्रेने महोत्सवाचा शुभारंभ होईल. शुक्रवारी सकाळी ८ वाजता सुरू होणाऱ्या या शोभायात्रेला महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा नगरसेवक अमित भुईगळ हे हिरवा झेंडा दाखवून रवाना करणार आहेत. या वेळच्या शोभायात्रेसाठी महात्मा फुले, भारतीय ज्ञान परंपरा, चवदार तळे पाणी सत्याग्रह शताब्दी आणि वंदे मातरम् सार्थ शताब्दी अशा चार महत्त्वपूर्ण थिम (विषय) निश्चित करण्यात आल्या आहेत. या थिमवर आधारित जय्यत तयारी विद्यार्थ्यांनी केली असून, शोभायात्रा शहराचे मुख्य आकर्षण ठरणार आहे.

## एस. एस. पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये फायर अवेअरनेस प्रोग्राम

### आगीच्या दुर्घटनेपासून बचावासाठी विद्यार्थ्यांना अग्निशमन विभागाचे प्रशिक्षण

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण /रायगड

द्रोणागिरी उरण येथे असलेल्या एस. एस. पाटील इंटरनॅशनल स्कूल मध्ये विद्यार्थ्यांमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजनांबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने फायर अवेअरनेस प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना आग लागण्याची कारणे, संभाव्य धोके तसेच आग लागल्यानंतर घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.



अग्निशमन विभागाचे उप अग्निशमन अधिकारी अमित कांबळी आणि लिडिंग फायरमेन सागर साळुंके यांनी विद्यार्थ्यांना आग कशी व कुठे लागू शकते, आगीची प्रमुख कारणे कोणती, आग लागल्यास घाबरून न जाता कोणत्या उपाययोजना कराव्यात, तसेच आग विझविण्याच्या विविध पद्धती याबाबत माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवत आग प्रतिबंधक उपायांची माहिती देण्यात आली.

आगीची दुर्घटना घडल्यास स्वतःचा बचाव करताना इतरांच्या सुरक्षिततेचीही काळजी कशी घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत कोणती खबरदारी घ्यावी, याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास एस. एस. पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या सल्लागार स्वातीताई म्हात्रे, मुख्याध्यापिका मृदुला धोंडी,सहसचिव किरण घरत, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश पाटील, महाराष्ट्र शासन शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सूर्यकांत ठाकूर, जेएनपीटीचे कर्मचारी संदीप पाटील तसेच स्कुलचे सर्व शिक्षक, कर्मचारीवर्ग आणि पालक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनपर कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांमुळे विद्यार्थ्यांना आगीच्या प्रसंगी घ्यावयाच्या खबरदारीची तसेच सुरक्षिततेच्या उपाययोजनांची अधिक प्रभावीपणे माहिती मिळाली.

दरम्यान, कोणत्याही ठिकाणी आग लागल्यास नागरिकांनी तातडीने अग्निशमन विभागाशी 8104961941 किंवा 022-69365600 या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन अग्निशमन विभागाच्या वतीने करण्यात आले.

## भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे यांचा वाढदिवस आ प्रशांत बंब यांच्या हस्ते वृक्ष देऊन साजरा

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद ९ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे पाटील यांचा वाढदिवस आ प्रशांत बंब यांच्या हस्ते वृक्ष देऊन साजरा करण्यात आला.

गदाना येथे सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून १०८०० झाडे लावण्याच्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी हा सत्कार करण्यात आला.

प्रकाश वाकळे हे २००१ पासून भारतीय जनता पार्टी च्या माध्यमातून विविध पदांवर काम करत असून गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टीचे आ प्रशांत बंब यांचे अत्यंत विश्वासू म्हणून ओळखल्या जातात व त्यांच्या माध्यमातून सामाजिक कार्य करीत आहेत.

आ प्रशांत बंब यांच्या नेतृत्वाखाली खुलताबाद तालुक्यातील प्रत्येक गावातील कार्यकर्ते व नागरिक यांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण नेहमी प्रयत्न करत असून पंतप्रधान. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या विविध योजनेचा लाभ तालुक्या तील शेतकरी. कामगार. सुशिक्षित बेरोजगार . लाडकी बहीण योजना. विधवा महिला.



गोरगरीब गरजूंना आपण प्रामाणिकपणे मदत केली असून त्यातून अनेकांना विविध योजनेचा लाभ मिळून दिला आहे . तसेच

खुलताबाद शहरासह तालुक्यातील हुशार मुलांना स्पर्धा परीक्षा. एम पी एस सी च्या परीक्षेच्या अभ्यासासाठी मोफत पुस्तके वाटप व विविध शाळांमध्ये वह्या व पेन साहित्य वाटप करण्यात आले.

वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना चंद्रशेखर बावनकुळे( महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य)यांनी शुभेच्छा पत्र पाठवून शुभेच्छा दिल्या आ प्रशांत बंब, खुलताबाद, पंचायत समितीचे सभापती सौ मंदाताई वाकळे, घृष्णेश्वर ट्रस्टचे अध्यक्ष जिल्हा परिषद सदस्य कुणाल दांडगे भाजपाचे ज्येष्ठ नेते किशोर ध्यानात जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष एल जी गायकवाड संजय खंडागळे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक संदीप निकम पाटील ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर नलावडे संतोष गायकवाड . फकीरराव भालेराव तालुका अध्यक्ष आर पी आय (आठवले गट ) यांच्यासह अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या

## धनगर नेते दिपक बोऱ्हाडे 12 सप्टेंबर रोजी हिंगोलीत

हिंगोली |धनगर समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नाला निर्णायक दिशा देण्यासाठी धनगर आरक्षण योद्धे दिपकभाऊ बोराडे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत परभणी येथे १७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या निर्णायक महा मेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी हिंगोली जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व समाजबांधवांची महत्त्वपूर्ण बैठक घेणार असल्याची माहिती धनगर समाज नेते गोपाल सातपुते यांनी दिली.

ही बैठक शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात पार पडणार आहे. या बैठकीदरम्यान धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीबाबत सविस्तर चर्चा, आगामी महा मेळाव्याची नियोजनपूर्व तयारी, समाजबांधवांमध्ये जनजागृती तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी जिल्हा संवाद साधण्यात येणार आहे. यानंतर पत्रकार परिषदही आयोजित करण्यात आली आहे.



परभणी येथे १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या निर्णायक महा मेळाव्याला हिंगोली जिल्ह्यातून मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी व्हावेत, यासाठी बैठकीत व्यापक नियोजन करण्यात येणार आहे. आरक्षणाचा प्रश्न हा संपूर्ण धनगर समाजाच्या भवितव्याशी निगडित असल्याने पक्ष, गट, तट आणि राजकीय मतभेद बाजूला ठेवून समाजहितासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हिंगोली जिल्ह्यातील सकल धनगर समाज, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, महिला तसेच समाजबांधवांनी या महत्त्वपूर्ण बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहून १७ सप्टेंबरच्या परभणी महा मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन आव्हानकर्ते धनगर समाज नेते गोपाल सातपुते सचिन मस्के (नाईक) भगवान पावडे विष्णू पौळ पवन पोले शिवाजी कोल्हे यांनी केले आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911